CAPACIT'E
INFRAPROJECTS LIMITED

Ref : CIL/STEX 47/AGM
Date : August 13, 2018

To

The Secretary,
BSE Limited
Corporate Relation Dept,
P.J. Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai-400 001

Scrip Code /Scrip Id: 540710/CAPACITE

The Secretary,
National Stock Exchange of India Limited
Plot No.C/1, G Block,
Bandra Kurla Complex
Bandra (East)
Mumbai-400 051

Scrip Symbol: CAPACITE

**Sub: Intimation of Newspaper Advertisement of Notice of the 6th Annual General Meeting, Remote E-Voting and Book Closure**

Dear Sir/ Madam,

Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed the copy of the newspaper advertisement of the Notice of 6th Annual General Meeting, remote e-voting and Book Closure published in following newspapers on August 12, 2018:

1. The Financial Express (National Daily English Newspaper)
2. Tarun Bharat (Marathi Edition Mumbai- newspaper in regional language)

This is for your information and records.

Yours Truly
**For CAPACIT'E INFRAPROJECTS LIMITED**

**Sai Kedar Katkar**
**Company Secretary & Compliance Officer**

**Mumbai (Head Office) :**
605-607, Shrikant Chambers, Phase-I, 6th Floor, Adjacent to R. K. Studios, Sion-Trombay Road, Chembur, Mumbai- 400071. Maharashtra, India Tel: 022 7173 3717 • Fax.: 022 7173 3733 • Email: info@capacite.in

NCR I Bangalore CIN : L45400MH2012PLC234318 www.capacite.in

## थोडक्यात

### आचार्य अत्रे पुरस्कार सोहळा

**मुंबई:** मुंबई मराठी पत्रकार संघाच्यावतीने 'आचार्य अत्रे पुरस्कार' प्रदान समारंभ १३ ऑगस्ट रोजी सकाळी साडे अकरा वाजता पत्रकार भवन, आझाद मैदान, महापालिका मार्ग येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी मुंबई मराठी पत्रकार संघाचे ज्येष्ठ सदस्य सन्मान योजना'चे धनादेश वाटप करण्यात येणार आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते दै. 'नवशक्ती'चे संपादक सुकृत खांडेकर यांना आचार्य अत्रे पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. यावेळी उद्योगमंत्री सुभाष देसाई उपस्थित असणार आहेत.

### 'डिजिटल बँकिंग व्यवहार'

**मुंबई :** मराठी विज्ञान परिषदेच्या सुवर्णमहोत्सवी व्याख्यानमालेत, 'डिजिटल बँकिंग व्यवहार' याविषयी विवेक मेहेत्रे यांचे व्याख्यान आयोजित केले असून शनिवार दि. १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता मराठी विज्ञान परिषद, विज्ञान भवन, वि.ना. पुरव मार्ग, ए. टी. आय. समोर, शीव-चुनाभट्टी, मुंबई येथे होणार आहे. हे व्याख्यान सर्वांसाठी विनामूल्य आहे. संपर्क : ०२२ - २४०५४७१४ / २४०५७२६८)

### रग्बी विश्वचषकाच्या आयोजकांमध्ये भारत

**मुंबई :** रग्बी विश्वचषकाच्या आयोजनासाठी निवडलेल्या १८ देशांमध्ये भारताचाही समावेश असल्याचे सांगत रग्बी हा खेळ भारतात लोकप्रिय करणार असल्याचा निर्धार रग्बी इंडियाचे सरचिटणीस महेश मथाई यांनी व्यक्त केला. २० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत जपानमध्ये रग्बी विश्वचषकाचा थरार रंगणार आहे. २०१९चा रग्बी विश्वचषक स्पर्धेचा चषक सध्या भारत भेटीवर असून मुंबईत नुकतेच बॉम्बे जिमखाना येथे स्वागत करण्यात आले. यावेळी वर्ल्ड रग्बीचे सीईओ ब्रेट गॉस्पर, एशिया रग्बीचे अध्यक्ष आगा हुसेन, रग्बी इंडियाचे सहसचिव निर्माते-अभिनेते राहुल बोस, अभिनेता सिध्दार्थ मल्होत्रा हे उपस्थित होते.

# म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासात 'हाऊसिंग' ऐवजी सर्व 'प्रीमियम'चेच प्रस्ताव?

## सहा लाख नव्या घरांच्या निर्मितीची अपेक्षा

**मुंबई, दि ११ (प्रतिनिधी):** जुन्या वसाहतींचा पुनर्विकास जलदगतीने होण्यासाठी शासनाने म्हाडाला नियोजन प्राधिकरणाचा दर्जा दिल्यानंतर 'म्हाडा'कडे आतापर्यंत इमारत परवानगी, सुधारित नकाशांची मंजुरी, भोगवटा प्रमाणपत्र आदींसाठी ६० प्रस्ताव आले आहेत. मात्र, सर्वच प्रस्ताव हे 'हाऊसिंग' ऐवजी 'प्रीमियम'चेच असल्याने आता म्हाडाला सर्वसामान्यांना लॉटरीच्या माध्यमातून घरे उपलब्ध करून देता येणार नसल्याची बाब समोर आली आहे.



शासनाने विकास नियंत्रण नियमावली ३३(५)मध्ये बदल करीत नव्या नियमांनुसार १८ मीटरपर्यंत किंवा त्याहून अधिक रूंद रस्त्यालगत असलेल्या भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींना चार चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यात आला आहे. त्यापैकी तीन चटई क्षेत्र निर्देशांकानुसार बांधकाम क्षेत्रफळ अधिमूल्य आधारित उपलब्ध होऊ शकेल. उर्वरित एक चटई क्षेत्र निर्देशांकानुसार उपलब्ध होणारा गृहसाठा संस्थेस म्हाडाला द्यावयाचा आहे व त्याकरिता म्हाडा संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेस बांधकाम खर्च देणार आहे.

याद्वारे समूह विकासास चालना मिळून सर्वसामान्यांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे म्हाडाचे उद्दिष्ट असताना तसेच पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांसाठी लाखो घरे निर्माण करणे, तसेच वसाहतींच्या पुनर्विकासातून सहा लाख नव्या घरांच्या निर्मितीची अपेक्षा म्हाडाला असताना प्रीमियम प्रस्तावामुळे हे साध्य होणार नसल्याचे दिसून येते.

मुंबई मंडळाचे मुख्यधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, ''म्हाडाकडे ६० प्रस्ताव आले आहेत. त्यातील ३२ प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. यातील काही प्रस्ताव हे प्रीमियमसह हाऊसिंगचेसुद्धा असून त्यांची छाननी सुरू आहे.''

# मुंबई महापालिका करणार विद्युत निर्मिती

**भांडुप, तानसा, पिसे पांजरापूर येथे प्रयोग**

**मुंबई, दि.११(प्रतिनिधी):** मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मुंबई महापालिकेने आता विद्युत निर्मितीकडे पाऊल टाकण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर भांडुप, तानसा, पिसे पांजरापूर येथे प्रयोग सुरू आहेत. भांडुप येथे २.५ मेगावॅट, पांजरापूरला २५० किलोवॅट आणि तानसा येथे ४० वॅट इतकी वीजनिर्मिती करण्यात येत असल्याची माहिती पालिकेचे मुख्य जल अभियंता अशोककुमार तवाडिया यांनी दिली.

वैतरणा, तानसा, मोडकसागर, मध्य वैतरणा, विहार आणि तुलसी, भातसा या धरणातून मुंबईला पाणीपुरवठा केला जातो. मुंबई शहराला प्रतिदिन ३८३५ दश लक्ष पाणी पुरविण्यात येते. भांडुप व पिसे पांजरापूर येथे पाण्यावर प्रक्रिया केली जाते, तर उर्वरित पाणी वाया जाते. या वाया जाणाऱ्या पाण्यावर पालिकेने वीज निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. तानसा येथे हायड्रॉपर टर्बाइनद्वारे वीज निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पातून निर्माण झालेल्या वीजेचा वापर विद्युत दिव्यांसाठी आणि यंत्रांसाठी केला जातो. अशाच प्रकारे पिसे पांजरापूर २५० किलोवॅट ऊर्जा निर्माण केली जाते, तर भांडुपमध्ये २.५ मेगावॅट ऊर्जा तयार केली जाते १० मेगावॅट करण्याचे पालिकेचे प्रयत्न आहेत.

> वीज निर्मिती प्रकल्प सुरू झाल्यास वीज बिलांसाठी द्याव्या लागणाऱ्या लाखो रुपयांची बचत होईल. असे प्रयोग राबविण्यास प्रशासन प्रयत्नशील आहे.
>
> **अशोक कुमार तवाडिया,**
> मुख्य जल अभियंता, मुंबई महापालिका

# आचार्य ग्यान प्रवाहातर्फे 'सिद्ध योग संग्रह' पुस्तकाचे पुनर्प्रकाशन

**मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी):** 'सिद्ध योग संग्रहाचे पुनर्प्रकाशन केंद्रीय आयुषमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते नुकतेच सायन आयुर्वेद महाविद्यालयात करण्यात आले. आयुर्वेदिक संशोधनातील एक आधारस्तंभ असणारे पंडित आचार्य यांच्या गौरवार्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आचार्य ग्यान प्रवाह यांनी या कार्यक्रमाचे यजमानपद भूषविले. 'सिद्ध योग संग्रह' हे दिवंगत वैद्य वाचस्पती आयुर्वेदमार्तंड पंडित जादवजी आचार्य यांनी लिहिलेल्या मूळ पुस्तकाची पुनरावृत्ती आहे.

यावेळी, आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. अशोक वैद्य, डॉ. एस. डी. कामत, डॉ. नुतन नाबर, डॉ. श्याम नाबर, डॉ. महेश हरित आणि डॉ. शैलेश नाडकर्णी यांची व्याख्याने झाली. तर, डॉ. हरिप्रसाद शर्मा यांचा संदेश वाचून दाखविण्यात आला.




यामध्ये त्यांनी के. जी. मित्तल आयुर्वेदिक महाविद्यालयातील बीएएमएसच्या शेवटच्या वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना 'सिद्ध योग संग्रहा'ची एक प्रत मोफत देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. आयुष मंत्रालयाकडून पंडित आचार्य यांच्या नावे एक लाख रुपयांचे राष्ट्रीय पारितोषिकही देण्यात येणार असल्याचे संकेत दिले.

# माहुल येथील रहिवाशांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करणार : आठवले

**मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी):** माहुलच्या रहिवाशांचे सुरक्षित योग्य ठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिले. त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या वसाहती समोरील भारत पेट्रोलियम प्रकल्पात झालेल्या स्फोटाच्या स्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी रिपाइंचे मुंबई अध्यक्ष गौतम सोनवणे, महाराष्ट्र- उपाध्यक्ष



दीपकभाऊ निकाळजे, चंद्रशेखर कांबळे, हसन शेख, सुमीत वजाळे, संजय डोळसे, हेमंत रणपिसे, रवी गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

मुंबईच्या विविध भागांमधील प्रकल्पग्रस्तांचे माहुल येथे पुनर्वसन करण्यात आले असून नागरीसुविधांच्या अभावी प्रदूषित वातावरणात जगणाऱ्या येथील रहिवाशांचे जीवन धोक्यात आले आहे. येथील भारत पेट्रोलियमच्या प्रकल्पात नुकताच मोठा स्फोट झाल्याने या प्रकल्पग्रस्तांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. या रहिवाशांची आज रामदास आठवले यांनी भेट घेऊन धीर दिला. येथील भयग्रस्तप्रकल्पग्रत रहिवाशांच्यावतीने विविध मागण्यांचे निवेदन आठवलेंना यावेळी देण्यात आले.

वसाहती समोरील भारत पेट्रोलियमला जर आग लागली तर येथून बाहेर पडण्यास येथील रहिवाशांना मार्गच नसल्याने ते भयभीत झाले असल्याचे रहिवाशांनी रामदास आठवलेंना सांगितले. त्यावर माहुलच्या रहिवाशांचे सुरक्षित योग्य ठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले.

# नाशिक जिल्हा परिषद इको प्रशासकीय इमारतीला मान्यता

## राज्यातील अत्याधुनिक सुविधेने सज्ज होणार पहिली इमारत

**नाशिक, दि.११(प्रतिनिधी):** जिल्हा परिषदेच्या त्र्यंबकेश्वर रस्त्यावरील कुक्कुटपालन केंद्राच्या जागेवर नवीन प्रशासकीय इको इमारतीच्या बांधकामास राज्य सरकारच्या उच्चाधिकार समितीने तत्वत: मान्यता दिली असल्याची माहिती अर्थ व बांधकाम सभापती मनीषा पवार यांनी दिली.



**सभापती मनीषा पवार यांची माहिती**

या इको इमारतीला आठ मजले असून १८ हजार ३४१ चौरसमीटर बांधकाम करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेची सध्याची इमारत प्रशासकीय कामकाज आणि वाहनतळाच्या अभावी अडचणीची ठरत आहे. त्यामुळे २१ मार्च २०१७ ला जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शीतल सांगळे यांनी अर्थ व बांधकाम सभापती मनीषा पवार यांनी पुढाकार घेतला होता.त्यानुसार नवीन प्रशासकीय इमारतीचा आराखडा जि.प अध्यक्षांना सादर केला होता. नाशिक त्र्यंबकरोडवरील कुक्कुटपालन केंद्राची जागा जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीसाठी मिळावी, अशी मागणी पशुसंवर्धनमंत्री महादेव जानकर यांच्याकडे करण्यात आली होती. त्यानुसार संयुक्त बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली.

कुक्कुटपालन केंद्र स्थलांतरासाठी मार्च २०१८ मध्ये जिल्हा नियोजन मंडळाकडून दोन कोटी ४९ लाखांचा निधी जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन व जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी. यांच्याकडून मंजूर करून घेतला आहे. अद्ययावत सोयी-सुविधांनी बांधण्यात येणाऱ्या इमारतीत दोन तळमजले वाहनतळासाठी, तर सहा मजल्यावर विषय समित्यांची कार्यालये, जि.प.अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे दालन, सभागृह, कॉन्फरन्स रूम, विश्रांती कक्ष, विविध कार्यालये असतील. पूर्णत: पर्यावरणीय, पुरेसा सूर्यप्रकाश आणि विजेची बचत, खेळती हवा, पाच लिफ्ट व चार जिने, दिव्यांगांसाठी रॅम्प, सौरऊर्जेचा वापर, गार्डन व वॉटर रिसायकल प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आदी असणार आहेत. इमारत बांधकामांसाठी ४६ कोटी रुपयांचा निधी खर्च अपेक्षित असून शासनाने आता मान्यता दिल्याने नाशिक जिल्हा परिषद इको इमारत बांधकामाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे ही अर्थ बांधकाम सभापती मनीषा पवार यांनी दै. 'मुंबई तरुण भारत'शी बोलतांना सागितले.

# डागडुजीच्या कामांकरिता रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक

**मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी):** मुंबई उपनगरीय रेल्वेच्या तिन्ही रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या मुलुंड-माटुंगा अप जलद मार्गावर, कुर्ला-वाशी अप व डाऊन हार्बर मार्गावर आणि चर्चगेट-मुंबई सेंट्रल मार्गावर मेगाब्लॉक घेतला जाणार आहे. मध्य रेल्वेच्या मुलुंड-माटुंगा अप जलद मार्गावर सकाळी सव्वा अकरा पासून ते सायंकाळी सव्वा चारवाजेपर्यंत डागडुजी करण्यासाठी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. कल्याणहून सकाळी १०.३७ पासून दुपारी ३.५६ वाजेपर्यंत अप जलद मार्गावर निघणाऱ्या सर्व उपनगरीय सेवा दिवा आणि परळ स्थानकांदरम्यान धीम्या मार्गावर वळविण्यात येतील. या गाड्या परळ स्थानकापर्यंत सर्व स्थानकांवर थांबतील.

कुर्ला-वाशी अप व डाऊन हार्बर मार्गावर सकाळी ११.१० वाजल्यापासून सायंकाळी ४.१० वाजेपर्यंत मेगाब्लॉक असणार आहे. ब्लॉक काळात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-कुर्ला आणि वाशी/पनवेल खंडावर विशेष सेवा चालविण्यातत येतील. पश्चिम रेल्वेच्या चर्चगेट ते मुंबई सेंट्रल स्थानकांदरम्यान रेल्वेमार्ग, सिग्नल तसेच इतर डागडुजी कामकरीता १०.३५ ते ३.३५ मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या काळात अप आणि डाऊन मार्गावरील सर्व गाड्या जलद मार्गावर धावणार आहेत.

# ...आणखी १० समस्या उभ्या राहतील

## बाबा रामदेव यांचा आसाम एनआरसीला पाठिंबा

**नवी दिल्ली, दि. ११ (वृत्तसंस्था):** गेल्याच महिन्यात सादर करण्यात आलेल्या आसाममधील एनआरसी अहवालावरुन आसामसह, पश्चिम बंगाल आणि संसदेतही गदारोळ माजवण्यात आल्यानंतर आता योगगुरु बाबा रामदेव यांनी एनआरसीला पाठिंबा देत देशात घुसखोरी करणाऱ्या बेकायदेशीरपणे राहणाऱ्या निर्वासितांवर नियंत्रण आणण्यासाठी हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हटले आहे. बेकायदाशीरपणे घुसखोरी करणाऱ्या निर्वासितांना आपण देशात राहण्याची परवानगी दिल्यास काश्मीरसारख्या आणखी १० समस्या उभ्या राहतील, असा इशाराही बाबा रामदेव यांनी दिला. ते एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी बाबा रामदेव यांनी देशात चार कोटी बेकायदेशीरपणे निर्वासित राहत असल्याचा दावादेखील केला.

बाबा रामदेव म्हणाले की, बेकायदेशीरपणे घुसखोरी केलेले निर्वासित नेहमी समस्याच उभ्या करतात. मग ते पाकिस्तानी असोत वा बांगलादेशी वा रोहिंग्या वा अमेरिकन. आधीच आपल्याला एक काश्मीरची समस्या हाताळणे अवघड जात आहे. त्यात जर रोहिंग्यांना देशात राहण्याची परवानगी दिली तर ते काश्मीरसारख्या आणखी १० समस्या उभ्या करतील, असा इशारा त्यांनी दिला.

बाबा रामदेव यांनी यावेळी आरक्षणावरही भाष्य केले. ते म्हणाले की, यासंबंधी कायदा करण्याची गरज आहे. ज्यानुसार मागास वर्गातही आरक्षण नेमके कोणाला मिळावे, हे स्पष्ट होईल. ज्यांना आरक्षणाची गरज नाही त्यांचा त्यात समावेश केला जाऊ नये. मात्र, समाजातील एका विशिष्ट समुदायाला अजूनही आरक्षणाची आवश्यकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## खबऱ्या समजून नक्षल्यांनी केली तरुणाची हत्या

**रायपूर, दि. ११ (वृत्तसंस्था):** पोलिसांचा खबऱ्या असल्याच्या संशयावरून नक्षलवाद्यांनी छत्तीसगडच्या दंतेवाडा जिल्ह्यात एका तरुणाची गोळ्या घालून हत्या केली. लोकेश करताम असे या तरुणाचे नाव असून, शुक्रवारी सायंकाळी काही नक्षली त्याच्या घरात घुसले आणि बंदुकीच्या धाकावर त्याला जंगलात नेले. तिथे त्याला गोळ्या घालण्यात आल्या. आज सकाळी गावाजवळील जंगलाच्या बाहेर त्याचा मृतदेह आढळून आला, असे पोलिसांनी सांगितले.

## राज्यभरात धाडी; १४ जण अटकेत

(पान १ वरुन) अटक करण्यात आल्याचे सांगितले जाते.दरम्यान, नालासोपारा स्फोटकांप्रकरणी अटक केलेल्या अवधूत पैठणकर आणि प्रसाद देशपांडे या दोघांना एटीएसनी चौकशीनंतर सोडल्याची माहिती समोर आली आहे.

# आयआयटी मुंबईला केंद्राकडून १ हजार कोटी रुपये

(पान १ वरुन) असलेल्या या संस्थांमधून जगाचे भविष्य आपल्याला दिसत आहे. नावीन्यता आणि उद्योगांच्या माध्यमातून भारताची विकसित अर्थव्यवस्थेची पायाभरणी होत आहे. या पायाभरणीतून शाश्वत आणि दीर्घकाळ तंत्रज्ञानावर आधारित आर्थिकवृद्धी होणार आहे. 'नावीन्यता' हा एकविसाव्या शतकातला एक महत्त्वाचा शब्द आहे. कोणतीही संस्था नावीन्यतेशिवाय स्थिर होऊ शकत नाही. याच नावीन्यतेच्या शोधातून भारत हे स्टार्टअपचे केंद्र म्हणून उदयास आले आहे. नावीन्यता आणि उद्योगासाठी भारत हे जगाचे आकर्षण केंद्र व्हावे, यादृष्टीने आपण प्रयत्न करीत असून हे केवळ शासनाच्या प्रयत्नांमधून हे होणार नाही तर त्यासाठी आपल्यासारख्या तरुणांची आवश्यकता आहे, असे सांगून केवळ शासकीय कार्यालय किंवा झगमगीत कार्यालयांमधून हे होणार नाही तर अशा नावीन्यपूर्ण संकल्पना आयआयटीसारख्या कॅम्पसमधून आणि आपल्यासारख्या युवकांच्या मनातून निर्माण होतील, असेही पंतप्रधान यावेळी म्हणाले.

प्रारंभी आयआयटी बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष दिलीप शंघवी यांनी दीक्षांत समारंभाचे प्रास्ताविक केले. तर संचालक प्रा. देवांग खक्कर यांनी अहवालाचे सादरीकरण केले. सिम्फनी एआय ग्रुपचे अध्यक्ष डॉ. रोमेश वाधवानी यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही मानद पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आयआयटी मुंबईच्या ऊर्जा विज्ञान आणि अभियांत्रिकी तसेच पर्यावरण विज्ञान आणि अभियांत्रिकी केंद्राच्या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. आयआयटी मुंबईच्यावतीने विकसित करण्यात आलेल्या विविध तंत्रज्ञानाधारित प्रदर्शनाला पंतप्रधान मोदी यांनी भेट देऊन पाहणी केली आणि या प्रदर्शनातील उपकरणे, शोध पाहून त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# घुसखोरांचे लाड करणाऱ्या तृणमूल राजवटीला उखडून टाका

(पान १ वरुन) बंगालमध्ये कमळच उमलणार आहे. इथे उपस्थित असलेल्या जनसागरातून हाच संदेश मिळतो आहे. मुख्य म्हणजे बंगालच्या जनतेलाच राज्यात परिवर्तन हवे आहे,'' असेही शाह म्हणाले. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आव्हान देत शाह म्हणाले की, ''आमचा आवाज त्या दाबू शकत नाही.'' शाह यांनी यावेळी काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर टीकेचे आसूड ओढले.

आसाममधील राष्ट्रीय नागरिकता नोंदणी-एनआरसीवरील ममतांच्या भूमिकेबद्दल शाह म्हणाले की, ''एनआरसीच्या माध्यमातूनच बांगलादेशी घुसखोरांना रोखले जाऊ शकते. तरीही ममता बॅनर्जींचा एनआरसीला नेमका विरोध कशामुळे आहे? इथले नागरिकही बांगलादेशी घुसखोरांना सहन करु शकणार नाहीत. असे असूनही ममता बॅनर्जी या घुसखोरांना इथे शरण देऊ इच्छितात, ते का?'' असा सवाल करतच शाह यांनी कोणी कितीही विरोध केला तरी एनआरसीची प्रक्रिया थांबवली जाणार नाही, असेही त्यांनी ठणकावले. शिवाय एनआरसीच्या प्रक्रियेतून आढळलेल्या घुसखोरांना त्यांच्या देशात परत पाठवण्याचेही काम केले जाईल, तर हिंदू, बौद्ध आणि ख्रिस्ती शरणार्थ्यांबद्दल अमित शाह म्हणाले की, ''आम्ही अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेशातून राज्यात आलेल्या या सर्वच शरणार्थ्यांना नागरिकत्व अमेंडमेंट बिल-२०१६ द्वारे भारतीय नागरिकत्व देण्यात येईल हा विश्वास देतो.

### भाजपच्या ६५ कार्यकर्त्यांची हत्या

भाजप अध्यक्ष अमित शाह म्हणाले की, ''नुकत्याच झालेल्या पंचायत समितींच्या निवडणुकीत ममता सरकारने विरोधी पक्षांच्या उमेदवारांना उभे राहू दिले नाही आणि सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांची बिनविरोध निवड करण्याचाही विक्रम केला. भाजपच्या ६५ कार्यकर्त्यांची इथे हत्या करण्यात आली, तरीही पक्षाचे प्रदर्शन शानदार राहिले व ७ हजार ठिकाणी भाजपचे उमेदवार विजयी झाले. हा ममता बॅनर्जी सरकारला जनतेने दिलेला इशाराच आहे. पश्चिम बंगालच्या जनतेने काँग्रेस, कम्युनिस्ट पक्ष आणि तृणमूल काँग्रेसला संधी दिली पण या पक्षांनी राज्याचा विकास केला नाही. आता भाजपला संधी मिळाली तरच राज्याचा विकास होईल,'' असे अमित शाह यांनी यावेळी आश्वासन दिले. सोबतच शाह यांनी सर्व कार्यकर्त्यांनी घरोघर जाऊन भाजपचे कमीतकमी २२ खासदार निवडून येतील यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन केले.

### देशाच्या एकता आणि अखंडतेला घुसखोर धोकादायक

बांगलादेशातून आलेले घुसखोर आसाम आणि पश्चिम बंगालच नव्हे, तर देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी धोकादायक आहेत. जर त्यांना रोखले नाही, तर देशाच्या सुरक्षेला धोका पोहोचू शकतो असा इशारा देत अमित शाह म्हणाले की, ''देशात घुसलेले घुसखोर तृणमूल काँग्रेसचे मतदार आहेत. त्यामुळेच तो पक्ष आणि त्यांचे प्रमुख घुसखोरांचे समर्थन करत आहे. ममता बॅनर्जींच्या अशा भूमिकेमुळे त्यांच्या राजवटीत बंगाल असुरक्षित झाला आहे. जोपर्यंत पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार स्थापन होत नाही, तोपर्यंत घुसखोरांच्या समस्येवर योग्य उत्तर मिळू शकत नाही आणि या समस्येवरील एकमेव तोडगा एनआरसी हाच आहे.

**CAPACIT'E INFRAPROJECTS LIMITED**

**Regd Office:** 605-607, Shrikant Chambers, Phase-I, 6th Floor, Adjacent to R. K. Studios, Sion- Trombay Road, Mumbai- 400 071. **CIN:** L45400MH2012PLC234318
**Telephone:** +91 (22) 7173 3717; **Facsimile:** +91 (22) 7173 3733;
**Email:** compliance@capacite.in; **Website:** www.capacite.in

**NOTICE OF THE 6TH ANNUAL GENERAL MEETING, E-VOTING AND BOOK CLOSURE**

**NOTICE** is hereby given that the sixth Annual General Meeting (AGM) of **CAPACIT'E INFRAPROJECTS LIMITED** will be held at Emerald Hall, The Acres Club, The Acres Club, 411-B, Opp. Bhakti Bhawan, Hemu Kalani Marg, Chembur East, Mumbai- 400 071 on Monday September 3, 2018 at 11:30 AM to transact the business as set out in the Notice of the Annual General Meeting dated July 30, 2018.

The Annual Report for the Financial Year 2017-18 along with Notice of the Annual General Meeting, Proxy Form and Attendance Slip has been sent through electronic mode to those shareholders whose Email IDs are registered with the Depository Participants/ Company/ Registrar & Transfer Agent (RTA) and has been dispatched to other shareholders at their registered address by permitted mode. These documents are also available on the website of the Company www.capacite.in.

Pursuant to the provisions of Section 108 of the Companies Act, 2013 read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 as amended by the Companies (Management and Administration) Amendment Rules, 2015 and Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 entered into with Stock Exchanges, the Company is offering e-voting facility including remote e-voting facility to all the shareholders of the Company in respect of the business to be transacted at the aforesaid Annual General Meeting. The Company has engaged the services of Karvy Computershare Private Limited, Hyderabad, the Company's Registrar and Share Transfer Agents ('Karvy') to provide the e-Voting facility.

**The members are informed that:**

a) The business as set forth in the Notice of the AGM may be transacted through voting by electronic means;
b) A person whose name is recorded in the Register of Members or in the Register of Beneficial Owners maintained by the Depositories, as on the cut-off date i.e. Friday, July 27, 2018, shall only be entitled to avail the remote e-voting facility or voting at AGM;
c) The e-voting period shall commence at 9:00 a.m. on August 31, 2018 and will end on 5:00 p.m. September 02, 2018;
d) The e-voting module shall be forthwith blocked by Karvy thereafter. Once the vote on a resolution is cast by the shareholders, the member shall not be allowed to change it subsequently.
e) Any person who holds shares as on cut-off date July 27, 2018, shall be entitled to vote at the AGM of the Company. A person who is not a shareholder as on the cut-off date should treat this notice as information purposes only.
f) The Facility for voting through Ballot Paper shall be made available at the AGM venue and the shareholders attending the meeting who have not cast their vote by remote e-voting shall be able to exercise their right at the meeting through ballot paper.
g) The shareholders who have cast their vote by remote e-voting may attend the meeting but shall not be entitled to cast their vote again.
h) In case of any queries, you may refer to the Frequently Asked Questions (FAQs) for Members and e-voting user manual for shareholders available at the download section of https://evoting.karvy.com or contact Mr. Raju S V of Karvy at +91 40 6716 2222 or at 1800 345 4001 (toll free).

It is further informed that pursuant to Section 91 of the Companies Act, 2013 and Regulation 42 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Register of Members and Share Transfer Books of the Company shall remain closed from Tuesday, August 28, 2018 to Monday, September 03, 2018 (both days inclusive) for the purpose of Annual General Meeting.

**By order of the Board of Directors**
**Date : August 11, 2018** **Sai Kedar Katkar**
**Place : Mumbai** **Company Secretary & Compliance Officer**